**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३.२३०९७१० **E.Mail - pilcbnskr@gmail.com**

---

# प्रेसनोट

दिनांक:- ०६/०४/२०१८

## नांदुरी-गड शिवारात चैत्र पौर्णिमेच्या दिवशी झालेल्या खुनाचे गुन्हयाचा स्थानिक गुन्हे शाखेने केला उलगडा, ०३ आरोपी ताब्यात

---

शनिवार दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी चैत्र पोर्णिमा अर्थात चैत्रोत्सवाच्या दिवशी सप्तश्रृंगी गडावर लाखो भाविक दर्शनासाठी दाखल झाले होते. गडावर दर्शन घेण्यासाठी भाविकांची लगबग सुरू असतांना मध्यरात्रीचे सुमारास नांदुरी गावापासुन कळवणच्या दिशेने चिखलीपाडा फाटयाचे पुढे एक अज्ञात पुरूषाचे प्रेत नग्न अवस्थेत मिळुन आले होते. मयत पुरूषास कोणीतरी अज्ञात इसमांनी अज्ञात कारणावरून त्याचे अंगावरील कपडे काढुन पोटात, बरगडीवर तसेच डावे पायाचे मांडीवर व कमरेवर धारदार हत्याराने वार करून जिवे ठार मारले होते. सदर बाबत **कळवण पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नंबर २५/२०१८ भादवि कलम ३०२** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तपासात मयत पुरूष हा **प्रभाकर राजाराम सोनवणे, रा. पाळे खुर्द, कोल्हापुर फाटा, ता.कळवण, जि.नाशिक** असे असल्याचे निष्पन्न झाले.

सदर घटनेबाबत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी तात्काळ दखल घेवुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास घटनास्थळावर पाचारण केले व सदर खुनाचे गुन्हयातील अज्ञात मारेक-यांचा शोध घेणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी घटनास्थळी धाव घेवुन घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. तसेच मयत इसम नामे प्रभाकर राजाराम सोनवणे याचे दैनंदिन राहणीमान व कामधंद्याबाबत सविस्तर माहिती घेवुन मयताचे कोणाशी वाद होते का, याबाबत आजुबाजूचे गावांमध्ये तपास करणेबाबत पथकास सुचना दिल्या. दरम्यान दिनांक ०५/०४/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कळवण, वणी, तसेच नांदुरी गडावर सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांना खब-यांमार्फत गुप्त बातमी मिळाली की, पाळे बु।। परिसरातील काही तरूण चैत्र पौर्णिमेच्या दिवशी गडावर दर्शनासाठी आले होते व त्यांचे एका इसमासोबत वाद झाले असल्याचे समजले वरून स्थागुशाचे पथकाने संशयीत तरूण नामे **१) विशाल समाधान शिंदे**, रा. कळवण खुर्द, ता.कळवण, **२) सुमित कैलास देवरे,** रा. कुंडाणे, ता. कळवण, **३) ऋषिकेश विलास जाधव,** रा. पाळे बु।।, ता. कळवण यांना पाळे बु।। परिसरातुन ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले तीनही तरूणांना विश्वासात घेवुन अतिशय कौशल्याने विचारपुस केली असता त्यांनी चैत्र पौर्णिमेच्या रात्री नांदुरी गावापासुन कळवण रस्त्यावर एका पुरूषास लाकडी दांडयाने तोंडावर व बरगडीवर मारहाण करून लोखंडी कटरने त्याचे अंगावर वार करून जिवे ठार मारले असल्याची कबुली दिली आहे.

मयत प्रभाकर राजाराम सोनवणे हा चैत्र पौर्णिमेच्या रात्री कळवण नांदुरी रोडवर शिरसमणी फाटा येथे त्याची मोटर सायकल लावुन उभा होता. त्यावेळी वरील आरोपी विशाल शिंदे, सुमित देवरे व ऋषिकेश जाधव असे त्यांचे मित्रांसह वणी गडावर दर्शनासाठी चालले होते, आरोपी विशाल याने मयतास विचारले तु कुठला आहेस, तेव्हा मयत व विशाल यांच्यात शिवीगाळ होवुन भांडण झाले तसेच आरोपी सुमित देवरे याने मयताचे खिशातील मोबाईल हिसकावुन सर्वजण नांदुरी रस्त्याने पायी पुढे गेले. दरम्यान मध्यरात्रीचे सुमारास चिखलीपाडा फाटयाचे जवळ मयत प्रभाकर सोनवणे हा त्याची मोटर सायकल घेवुन आला, व आरोपी विशाल व सुमित यांना माझा मोबाईल दया असे बोलु लागला, याचा राग मनात धरून आरोपी विशाल, सुमित व ऋषिकेश यांनी मयत प्रभाकर याचेशी वाद घालुन बाचाबाची केली, तसेच मयताचे अंगावरील कपडे ओढाताण करून फाडुन टाकले व त्यास जमिनीवर पाडुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच लाकडी दांडयाने तोंडावर व बरगडीवर जबर मारहाण करून आरोपी विशाल याने

त्याचे पॉकेटमधील कटर काढुन मयताचे अंगावर वार करून जिवे ठार मारले असल्याची कबुली वरील आरोपींनी दिली आहे.

वरील गुन्हयात आरोपी नामे **१) विशाल समाधान शिंदे**, रा. कळवण खुर्द, ता.कळवण**, २) सुमित कैलास देवरे,** रा. कुंडाणे, ता. कळवण**, ३) ऋषिकेश विलास जाधव,** रा. पाळे बु।।, ता. कळवण यांना ताब्यात घेण्यात आले असुन कळवण पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने अत्यंत चिकाटी व कौशल्यपुर्ण तपास करून सदर खुनाचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर गुन्हयात **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़ो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, पोउनि श्री.**मच्छिंद्र रणमाळे**, सपोउनि रविंद्र शिलावट, पोहवा दिपक आहिरे, दत्तात्रय साबळे, गणेश वराडे, पुंडलिक राउत, पोना अमोल घुगे, पोकॉ विश्वनाथ काकड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, राजु वायकंडे, संदिप लगड, चापोना रमेश काकडे, भुषण रानडे अशांचे पथकाने सदर खुनाचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.